MHST090014772021

| | |
|---|---|
| दाखल तारीख | : ०४.१२.२०२१ |
| नोंद तारीख | : ०४.१२.२०२१ |
| निकाल तारीख | : १४.०६.२०२२ |
| कालावधी | : वर्षे महिने दिवस |
| | ०० ०६ १० |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोरेगाव यांचे न्यायालयात**

( पिठासीन अधिकारी : गि. सु. माने )

नियमित फौजदारी संचिका क्र. ४५०/२०२१ निशाण क्र. २४

| | |
|---|---|
| महाराष्ट्र सरकार तर्फे,<br>वाठार पोलीस ठाणे, ता. कोरेगाव,<br>जि. सातारा. | अभियोग पक्ष |

विरुद्ध

| | |
|---|---|
| इरशाद हारुण मुल्ला,<br>वय– ३८ वर्षे, धंदा – ड्रायव्हर,<br>रा. वाठार, ता. कोरगाव, जि. सातारा. | आरोपी |

दोषारोप - भारतीय दंड संहिता कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणे.

=============================================

अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता – श्री. एस.आय.सावंत

आरोपीतर्फे विधिज्ञ – श्री. व्ही.एस.शिरतोडे

=============================================

## न्यायनिर्णय

( घोषित दिनांक १४ जून २०२२ )

आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा तोहमत आहे.

२. **अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे :**

दिनांक ११/०७/२०२१ रोजी १६.०० वाजता ते १८.०० वाजताचे दरम्यान मौजे वाठार स्टे., ता. कोरेगाव गावचे हद्दीत प्रस्तुत आरोपी व इतर आरोपी यांनी आपसात संगनमत करुन तक्रारदारचे मालकीची रुपये २०,०००/– किंमतीची हिरो कंपनीची सीडी डिलक्स मोटारसायकल के ए २९ एस ६८३१ तक्रारदारचे संमती शिवाय मुद्दाम लबाडीने चोरी करुन नेऊन सतीश राजाराम कंक यास विक्री केली. सबब तक्रारदार याने आरोपींविरुद्ध वाठार पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

३. कोरेगाव पोलीस ठोणेचे अंमलदार यांनी सदर तक्रारीवरुन गु.र.क्र. १२२/२०२१ भारतीय दंड संहिता कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा नोंद केला व त्याचा तपास सहा. पो. फौजदार एस.एस.गुजर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. त्यांनी साक्षीदारांकडे चौकशी करुन त्यांची तपास टिपणे नोंदविली. त्यानंतर वाठार पोलीस ठाणेमार्फत आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३७९ सह कलम

३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. प्रस्तूत कामी मी निशाणी क्र. २० ला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३७९ या गुन्हयाकरीता दोषारोप निश्चित केले आहे व दोषारोपपत्रातील मजकूर आरोपीला त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगण्यात आला आहे. प्रस्तुत आरोपीने नि.क्र. २१ चे निवेदन व नि.क्र. २३ च्या पुरसीस द्वारे गुन्हा कबुल केला आहे. प्रस्तुत आरोपीने त्याचे विधिज्ञ श्री. व्ही. एस. शिरतोडे यांच्या समक्ष गुन्हा कबूल करत असल्याचे लेखी स्वरुपात स्पष्ट केले आहे. त्यामुळे तो सदरचा गुन्हा स्वेच्छेने व कोणत्याही दबावाशिवाय कबूल करत आहे हे स्पष्ट होते.

५. आरोपीने वरील प्रमाणे स्वेच्छेने गुन्हा कबूल केला असल्याने मी आरोपीचे प्रतिकथन स्वीकारुन त्याला याद्वारे दोषी ठरवित आहे. आरोपीला दयावयाच्या शिक्षेसंदर्भात अभियोग पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.एस.आय.सावंत व आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. व्ही.एस.शिरतोडे यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. प्रस्तूत आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञांनी त्याला कमीत कमी शिक्षा व्हावी अशी विनंती केली आहे. याउलट अभियोग पक्षामार्फत सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा व्हावी असा युक्तिवाद सादर केला.

६. भारतीय दंड संहिता कलम ३७९ नुसार गुन्हा शाबीत झाल्यास आरोपीला तीन वर्षे कारावासाची किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही अशी शिक्षा आहे. आरोपी

याने स्वेच्छेने गुन्हा कबूल केला आहे. यावरुन त्याचा प्रामाणिकपणा दिसून येतो. प्रस्तुत आरोपी हा तरुण असून त्याचे संपूर्ण आयुष्य अदयाप बाकी आहे. त्याला उर्वरीत कालावधी तुरुंगात काढावा लागल्यास तो गुन्हेगारांच्या संपर्कात येवून वाममार्गाला लागण्याची शक्यता आहे. झालेल्या कृत्याचा त्याला स्वतःला पश्चाताप होत आहे. आरोपीला शिक्षा देण्याचा उद्देश हा आरोपीने गुन्हेगारी कृत्ये करु नये, गुन्हेगारी कृत्य केल्यास त्याच्या परिणामाची जाणिव त्याला असावी व शिक्षेनंतर त्याची सुधारणा व्हावी हा असतो.

७. चोरीला गेलेले वाहन मुळ मालकास परत मिळाले आहे असे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते. ज्याअर्थी आरोपीला पश्चाताप झालेला आहे, त्याअर्थी तो यापुढे असा गुन्हा करणार नाही असे वाटते. त्याच्या या कबूलीमुळे न्यायालयाचा वेळ वाचणार आहे. त्याला त्याचे पुढील भविष्य घडविणेसाठी संधी देणे न्यायोचित वाटते. या सर्व बाबींचा विचार करुन या आरोपीस शिक्षेमध्ये दया दाखविणे न्यायोचित वाटते. या कामी प्रस्तुत आरोपी एकुण आठ महिने दोन दिवस कारागृहात बंदी आहे असे दिसुन येते. तेवढीच कारावासाची शिक्षा सुनावणे योग्य वाटते. सबब, आरोपीला भारतीय दंड संहिता कलम ३७९ सह कलम ३४ नुसार आठ महिने दोन दिवस कारावास अशी शिक्षा सुनावणे न्यायोचित वाटते. सबब, या कारणास्तव मी खालील आदेश पारीत करीत आहेः

## आदेश

१. आरोपी इरशाद हारुण मुल्ला, रा. वाठार, ता. कोरेगाव, जि. सातारा यास भारतीय दंड संहिता कलम ३७९ या शिक्षापात्र गुन्हयाकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४१ अन्वये दोषी ठरविण्यात येते.

२. आरोपी याला भारतीय दंड संहिता कलम ३७९ या शिक्षापात्र गुन्हयाकरीता आठ महिने दोन दिवस साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येते.

३. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ नुसार आरोपीने भोगलेला स्थानबद्धतेचा कालावधी कारावासाच्या शिक्षेतून वजावट करणेत येतो.

४. सदर न्यायनिर्णयाची प्रत आरोपीस विनाशुल्क त्वरीत देण्यात यावी.

५. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ – अ अन्वये रुपये १५,०००/– ची जमानत दयावी.

(न्यायनिर्णय न्यायालयात श्रुतलेखीत व अधि–घोषित करण्यात आला.)

GIRISH SUDARSHAN MANE
Digitally signed by GIRISH SUDARSHAN MANE
Date: 2022.06.16 13:10:12 +0530

स्थळ : कोरेगाव.
दिनांक : १४.०६.२०२२.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगाव.